**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड - 422101**
दुरध्वनी क्र. : 0253-2461439 Email : dycomplan.nashik@maharashtra.gov.in
विभागाचे नाव : नियोजन शाखा संकलन : कुंभमेळा

---

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक.

**विषय:- दिनांक** 10 **डिसेंबर** 2024 **रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

महोदय,

**उपरोक्त विषयास अनुसरुन** दिनांक 10, डिसेंबर 2024 रोजी **रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली सिंहस्थ कुंभमेळा सन** 2027 **अंतर्गत** बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. विभागीय आयुक्त महोदय यांचे सूचनेनुसार इतिवृत्त आपले कार्यालयाचे स्तरावर सर्व कार्यान्वयीण यंत्रणांना निर्गमित करण्यात येवून इतिवृत्तात नमुद केल्याप्रमाणे त्या-त्या विभागाशी संबंधीत असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करुन तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा. ही विनंती.

**आपला विश्वासू,**

**सोबत. बैठकीचे इतिवृत्त.**

Signed by Yogendra Ashok Chaudhari
Date: 14-12-2024 21:24:34

**(योगेंद्र चौधरी)**
**उपआयुक्त (नियोजन)**
**नाशिक विभाग, नाशिक**

**दिनांक 10/12/2024 रोजी विभागीय आयुक्त नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे कुंभमेळा 2027 चे नियोजनाबाबची बैठक घेण्यात आली. त्यात अनेक सूचना देण्यात आल्या त्यातील प्रमुख सूचना पुढील प्रमाणे.**

| अ.क्र. | बैठकीत दिलेल्या सूचना | कार्यवाही करणारे विभाग |
|---|---|---|
| 1 | सर्व विभागांनी त्यांच्याकडील कामाचा प्राधान्यक्रम द्यावा, तसेच प्रत्येक कामामध्ये वेगवेगळे पर्याय द्यावे. याबद्दलच्या सूचना दिनांक 10/12/2024 च्या पत्राव्दारे निर्गमित केल्या आहेत. | सर्व विभाग |
| 2 | कुंभमेळ्याशी संबंधित सर्व कामांच्या गुणवत्तेची काटेकोर तपासणी होणार आहे. गुणवत्तेची तपासणी केवळ अभियांत्रिकी दृष्टिने नसून त्याचे workmanship (कारागिरी/ कार्यकुशलता) आणि Aesthetics (सौंदर्य) च्या बाबतही असेल याची नोंद घ्यावी. कामाचे आराखडे तयार करताना त्या जागेचे सांस्कृतिक महत्व व परिसराचा अंदाज घेवून त्याला साजेशेच आराखडे बनवावेत. | सर्व विभाग |
| 3 | नाशिक महानगरपालिकेने सर्व विभागांना जीआयएस पोर्टल उपलब्ध करुन द्यावे. त्यांना लॉगिन व पासवर्ड द्यावा. सर्व विभागांनी त्यांचे विद्यमान पायाभूत सुविधा यांची नोंद त्याच्यावर करावी आणि त्याचप्रमाणे नियोजित कामांची माहिती त्याच्यावर नोंदवावी. आवश्यकतेनुसार नाशिक महानगरपालिकेने त्यांच्या कार्यालयातच इतर विभागांना महानगरपालिकेचे जीआयएस माहिती असणारे तांत्रिक मनुष्यबळाच्या मदतीने हे काम करण्यास मदत करावी. | नाशिक महानगर पालिका व इतर सर्व विभाग |
| 4 | काही कामे उदा. (सी.सी.टी.व्ही, पब्लिक ॲड्रेस सिस्टीम) एकापेक्षा अधिक विभागाने प्रस्तावित केले आहेत. यापैकी काही कामे आधीच इतर विभागांकडून (उदा. नाशिक म्यूनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड (NMSCDCL) पूर्ण केलेले आहेत. इतर सर्व विभागांनी याबाबत केलेल्या कामाचा अंदाज घेवून त्यातील गॅप्स लक्षात घेवून केवळ उर्वरित आराखडेच सादर करावेत. तसेच अशा प्रकारच्या पायाभूत सुविधांचा एकापेक्षा जास्त विभागांनी वापर करावा जेणेकरुन शासनाच्या निधीचा सुयोग्य वापर होईल. सी.सी.टी.व्ही.च्या आराखड्याबाबत पोलिस आणि महानगरपालिका यांनी NMSCDCL कडे आपल्या प्रस्तावाची प्रत सादर करावी. याबाबत NMSCDCL ने सर्व CCTV आणि PA SYSTEM चे GIS वर mapping करुन गॅप्स पाहाव्यात आणि त्याच्या आधारे नियोजन करावे. तसेच भविष्यात रेल्वे स्थानक, बसस्थानके, इत्यादी वर्दळीच्या जागांचेही Video feed मुख्य नियंत्रण कक्षात उपलब्ध करुन घ्यावे आणि अशा सर्व video वर video analysis करुन त्याचे alerts सर्व संबंधित यंत्रणा (उदा. पोलीस, अग्नीशमन, इ. ) यांना उपलब्ध करुन द्यावे. अशा प्रकारचे नियोजन करुन त्याचे सादरीकरण करावे. त्र्यंबकेश्वर बाबत असे नियोजन करण्याची तांत्रिक क्षमता व मनुष्यबळ याबाबत माहीती त्र्यंबकेश्वर नगरपालिका, त्र्यंबकेश्वर मंदीर संस्थान, त्र्यंबकेश्वर, नाशिक ग्रामीण पोलीस आणि सा.बां.वि. यांनी कळवावी. तसेच NMSCDCL ची तांत्रिक क्षमता पाहता त्यांनीही याबाबत हे काम त्यांना शक्य होईल काय ते कळवावे. | NMSCDCL<br>नाशि शहर पोलीस,<br>नाशिक महानगर पालिका,<br>त्र्यंबकेश्वर नगरपरिषद,<br>त्र्यंबकेश्वर मंदीर संस्थान,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग<br>नाशिक ग्रामीण पोलिस,<br>महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,<br>मध्य रेल्वे, नाशिक रोड |
| 5 | आराखडयात कुंभमेळयाशी थेट संबंध असणारी कामे टाकावीत. कुंभमेळ्याच्या निमित्ताने विभागाची कुंभमेळ्याशी संबंधित नसलेली कामे सादर करु नयेत. तथापि | सर्व विभाग |

| | | |
|---|---|---|
| | येणारा कुंभमेळा पाहता आणि नाशिक- त्र्यंबकेश्वर परिसरातील वाढते नागरिकीरण, औद्योगिकीकरण इत्यादी पाहता आवश्यकतेनुसार इतर कामे संबंधित विभागाच्या अंदाजपत्रकात वेगळ्याने घ्यावीत. ज्याठिकाणी भाडेतत्वावर सेवा/ पायाभूत सुविधा घेण्याचा खर्च खरेदीपेक्षा अधिक आहे, त्या ठिकाणी संबंधित सुविधा/ पायाभूत सुविधा विकत घेता येतील. | |
| 6 | काही बाबी (बॅरिकेडींग, ॲम्ब्युलन्स) ची गरज कुंभमेळ्यात मोठया प्रमाणावर असते. तथापि त्यानंतर त्याची गरज राहत नाही. अशा खरेदी केलेल्या वस्तू भविष्यात इतर जिल्हयांना/ शहरांना देता येईल याप्रकारे नियोजन करावे. | सर्व विभाग |
| 7 | कुंभमेळयाच्या निमित्ताने नाशिक- त्र्यंबकेश्वरचे ब्रॅण्डींग होईल यापध्दतीने कामे आणि उपक्रम राबवावेत. | सर्व विभाग |
| 8 | पायाभूत सुविधा व इतर सेवांबरोबरच दोन्ही शहरात आणि परिसरात नाशिक- त्र्यंबकेश्वर परिसरात लोकसहभागाने सांस्कृतिक किंवा इतर स्वरुपाचे कार्यक्रम, विविध स्पर्धा इत्यादी पुढे जावून करणे प्रस्तावित आहे. जेणेकरुन सर्व नागरिक व समाजाचे सर्व घटक समाविष्ट होतील. | सर्व विभाग |
| 9 | प्रस्तावित केलेल्या कामांपैकी काही कामांमध्ये (उदा. संग्रहालय) केवळ भांडवली खर्च प्रस्तावित केला आहे. अशा कामांसाठी त्यानंतर सातत्याने देखभालीचा खर्च येतो. तो कुंभमेळ्याच्या आराखड्यातत देणे शक्य नाही. तरी असे प्रस्ताव सादर करताना ते कायमस्वरुपी आणि 100% वापरासह कार्यरत राहतील याचे वित्तीय नियोजन सादर करावे आणि त्याची शाश्वती द्यावी. | सर्व विभाग |
| 10 | कुंभमेळ्याशी संबंधित वाढीव मनुष्यबळ/ गर्दी पाहता काही विभागांनी अतिरिक्त विश्रामगृहे, रुग्णालये इत्यादींचे प्रस्ताव दिले आहेत. तथापि प्रशासनावर येणारा सदरचा ताण हा संबंधित सुविधा (उदा. हॉटेल, धर्मशाळा, मंगल कार्यालय, खासगी रुग्णालये) यांच्या सेवा भाडे/ प्रतिपूर्ती तत्वावर वापरुन घेता येतील आणि निधीची बचत करता येईल. | सर्व विभाग |
| 11 | महानगरपालिकेच्या गर्दी नियोजन आराखडयामध्ये बाह्य, मध्य आणि अंतर्गत अशी वाहनतळ दर्शविण्यात आली आहेत. तथापि हे नियोजन करताना महानगरपालिका क्षेत्राबाहेरील सा.बां. विभागाचे वाहनतळे गृहीत धरण्यात आले नाहीत. तरी मागील कुंभमेळ्याच्या अनुभवाच्या आधारे नाशिक महानगरपालिकेने सर्व वाहनतळे (महानगरपालिका हद्दीच्या आतील आणि बाहेरील दोन्ही) आणि अंतर्गत वाहनतळापासून वाहनतळापर्यंत नजीकच्या नदीच्या घाटापर्यंत जाणारा रस्ता याचा कच्चा आराखडा तयार करावा आणि तो पुढील बैठकीपुर्वी तयार करावा आणि शहर पोलीस विभागाला द्यावा. यात कचरा संकलन गाड्या, पाणी पुरवठा टँकर, ॲम्ब्यूलन्स, अग्नीशमन गाड्या, पोलीस पॅट्रोल गाड्या इत्यादींसाठी वाहतूक व्यवस्थेचे देखील नियोजन करायचे आहे. आवश्यकतेनुसार हीच प्रक्रिया पोलीस विभागाने वेगळ्याने देखील करावी याबाबत पुढील बैठक दिनांक 17/12/2024 रोजी या मुद्यावर प्रामुख्याने या पायाभूत सुविधा बनविणाऱ्या सर्व यंत्रणा (महानगरपालिका, नगरपालिका, सा.बा.वि,) आणि गर्दी नियोजन, आपत्कालीन परिस्थती हाताळणाऱ्या सर्व यंत्रणा (पोलीस, अग्नीशमन दल, आरोग्य विभाग, इ.) यांची एकत्रित बैठक घेण्यात येईल. त्र्यंबकेश्वर बाबत अशा वाहतुक आणि गर्दी नियोजनाची प्रक्रीया त्र्यंबकेश्वर नगर पालिका, ग्रामीण पोलीस आणि सा.बां. | नाशिक महानगरपालिका, नाशिक शहर पोलीस, नाशिक ग्रामीण पोलीस, त्र्यंबकेश्वर नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग |

| | | |
|---|---|---|
| | विभागाने करावी व येत्या 2 आठवडयात त्याचे सादरीकरणे करावे. | |
| 12 | विविध विभागांनी अपेक्षित गर्दी, वाहने इत्यादी संख्येबद्दल माहिती दिली आहे. त्यात विभागांची आकडेवारी वेगवेगळी दिसते तरी त्यांनी त्यांचा अंदाज काढताना काही प्रक्रिया राबविली असेल तर त्याची थोडक्यात माहिती किंवा कुठल्या स्त्रोताव्दारे ती माहिती उपलब्ध झाली असल्यास ते नमुद करुन माहीती द्यावी जेणेकरून नियोजन करणे सोयीचे होईल. | सर्व विभाग |
| 13 | आरोग्य सेवेशी संबंधित एकंदरीत आराखडा हा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद आणि आरोग्य अधिकारी नाशिक महानगरपालिका, तसेच त्र्यंबकेश्वर नगरपालिका, नाशिक येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अशा वेगवेगळ्या यंत्रणांकडून प्रस्तावित आहे. तसेच याकामी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील खाजगी आरोग्य संस्था/ रुग्णालय यांचाही वापर करावा लागणार आहे. याबाबतच्या आराखड्याची तपासणी एकदा उपसंचालक, आरोग्य सेवा नाशिक यांनी या सर्वांची एकत्रित बैठक करून घ्यावी आणि यापुढे याबाबत त्यांनी कायमस्वरुपी या सर्वांवर एकत्रित नियंत्रण ठेवावे. | उपसंचालक आरोग्य, नाशिक महानगरपालिका, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा परिषद नाशिक |
| 14 | काही विभागांनी स्टेशनरी व दैनंदिन कार्यालयीन खर्च व कार्यालयीन बांधकाम अशा स्वरूपाची कामे प्रस्तावित केली आहे त्याची मागणी कुंभमेळयाच्या आराखडयात करु नये. | सर्व विभाग |
| 15 | काही विभागांच्या सादरीकरणामध्ये आकडेवारी मधून काही (उदा. आरोग्य) तर काही विभागांच्या एकत्रित अंतिम खर्च नमूद आहे मात्र तो किती संख्यने / प्रमाणात (क्वांटिटी आणि किती दरानुसार करणार (दर/ रेट) याबद्दलची माहिती नाही) (उदा. पोलीस). तरी सर्व विभागांनी आपले आराखडे देताना ते अधिकाअधिक अचूक असतील याची दक्षता घ्यावी जेणेकरुन अर्थ विभागात त्याची छाननी होताना त्यात प्रश्न विचारण्याची शक्यता राहणार नाही. | सर्व विभाग |
| 16 | नाशिक येथील साधूग्रामची जागा अधिग्रहीत केल्यास त्यात 11 वर्षे इतर काही उपक्रम राबवून महानगरपालिकेला उत्पन्न मिळवता येईल काय किंवा त्याचा इतर कोणताही पर्यायी वापर करता येईल काय. जेणेकरून सदरचे अधिग्रहण हे आर्थिकदृष्ट्या परवडणारे होईल. त्याबद्दलच्या कल्पना देण्याबाबत नाशिक महानगरपालिकेला सुचवण्यात आले होते त्यांनी ती प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करावी. | सर्व विभाग |
| 17 | आधीच्या कुंभमेळ्यात काम केलेले अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवा बदलीने, प्रतिनियुक्तीने, मानसेवी तत्वावर अथवा कंत्राटी तत्वावर घेता येतील काय याबाबत विचार सर्व विभागांनी विशेषत: नाशिक महानगरपालिकेने करावा. | नाशिक मनपा |

याशिवाय इतरही सूचना देण्यात आल्या व त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देवून बैठक समाप्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 14-12-2024 19:05:29

(डॉ. प्रवीण गेडाम)
विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती,
नाशिक